# कुटुंब आणि लग्नसंस्था

'कुटुंब' म्हणजे मानवी संघटनेचे मूळ घटक होय; ज्यात 'एका छत्राखाली, समान आर्थिक पातळी अनुभवणारे, सामाजिक बांधिलकी जपणारे स्त्री–पुरूष असे किमान एक जोडपे जे आपल्या स्वतःच्या किंवा दत्तक अपत्यांसोबत राहते'. त्यामुळे कुटुंब आणि लग्नसंस्था यांचा फार जवळचा संबंध आहे. आजची नवतरूणपिढी ही या दोन्ही गोष्टींची जोपासना करणारी उद्याची जबाबदार तरूणपिढी बनणार आहे. त्यामुळे सभोवतालची परिस्थिती पाहता या सदरात 'कुटुंब आणि लग्नसंस्था' ह्या विषयाचा समावेष करणे जरूरीचे वाटते.

फार पूर्वीपासून कुटुंब आणि त्यातील सदस्य यांची परस्परांसाठी काही कर्तव्ये अपेक्षित आहे. जसे कुटुंबाचे समाजातील स्थान, आर्थिक स्थैर्य, शैक्षणिक पातळी, कौटुंबिक सहजीवन आणि पुनरूत्पादनाचे कार्य ही कुटुंबाची त्यातील सदस्यांसाठी कर्तव्ये आहेत. तर एकमेकांविषयीचे प्रेम, जिव्हाळा, संरक्षण ही सदस्यांची त्यांच्या कुटुंबासाठी कर्तव्ये समजली जातात. तसेच या कार्यांची विभागणी देखील फार पूर्वीपासून केली आहे. आर्थिक स्थैर्य आणि संरक्षण हे पतीचे तर मुलांचे संगोपन आणि कौटुंबिक स्थैर्य हे पत्नीचे कार्य मानले जाते. पण आजच्या बदलत्या सामाजिक मूल्यांमुळे तसेच षैक्षणिक समानतेमुळे स्त्रिया आर्थिकदृष्टया स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण होऊ लागल्यात. त्यामुळे आर्थिक व कौटुंबिक स्थैर्य या कार्याची मिसळ झालेली आढळते. याचे काही फायदे आहेत तर काही तोटेही अनुभवास येऊ लागलेत.

एकीकडे 'कुटुंब आणि लग्नसंस्था' टिकवण्यासाठी स्त्री–पुरूष दोघेही सारख्या प्रमाणात जबाबदार असल्याचे काही जण मान्य करू लागलेत हा फायदा झाला तर दुसरीकडे दोघांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कौटुंबिक स्थैर्य धोक्यात येऊ लागले आहे. 'हम दो हमारे (एक या) दो' अषी सुटसुटीत कुटुंबाची संकल्पना अस्तित्वात आली. तषातच एकत्र कुटुंब पद्धतीला केव्हाच तडा गेलेला असल्यामुळे थोडयाफार प्रमाणात घरातील मोठ्या व्यक्तींचा वचकही कमी झाला आहे. याचे फायदे कमी आणि तोटे जास्त दिसून येतात. तडजोड करायला किंवा सुवर्णमध्य साधायला पतीपत्नी दोघेही सहजासहजी तयार होत नसल्याच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. लग्नाची नव्हाळी ओसरता ओसरता कित्येक जोडप्यांची घटस्फोटाच्या दिषेने वाटचाल होत असलेली आढळते. विवाहबाह्य संबंध अन् त्यामुळे होणारे विच्छेद हा प्रष्न तर अक्राळविक्राळ स्वरूप धारण करू लागला आहे.

लग्नसंस्था या विषयावर बऱ्याच लेखक–लेखिकांनीही विचार मांडले आहेत, ते आजची सामाजिक परिस्थिती पाहता मोलाचे वाटतात. आजदेखील बहुसंख्य लोक लग्नसंस्थेचे जीवनातील महत्व जाणून लग्न टिकवून ठेवणे महत्वाचे मानतात. जास्त वेळा स्त्रिया पण, क्वचित वेळा पुरुषसुदधा स्वतःला भरपूर वाकवून लग्नसंस्थेने ऋण फेडताना दिसतात. जे या चक्राषी जुळवून घेऊ शकत नाहीत ते चक्क बाहेर फेकले जातात आणि भावनिक क्षेत्रातल्या या अपयषाचे पडसाद त्याच्या अथवा तिच्या व्यवसायावर, सामाजिक स्थानावर आणि त्यापेक्षा अत्यंत महत्वाचे म्हणजे अपत्यांच्या भावजीवनावर उमटतात.

अषा परिस्थितीत 'टिकवलेल्या' लग्नापेक्षा करियरमध्ये नाव मिळवलेले उत्तमच असा विचार एखादया स्त्री किंवा पुरूषाने केला तर त्यात चूक तरी कषी मानायची? मातृत्वाची बरोबरी करून शकले नाही तरीही व्यवसायातील छोटे, मोठे यष तेवढा अन् तसाच आनंद देत नसेल कषावरून? तसेच मुलाने रिपोर्टकार्ड फलकावत मिठी मारणे, आणि सेमिनारमध्ये आपलेच भाषण सर्वांच्या पसंतीला उतरणे यामध्ये डावे–उजवे करणे खरंच कठीण आहे. अषा महत्वाकांक्षी लोकांना 'लग्न' बंधनकारक वाटू शकते. पण ज्या असामान्य कर्तृतवाच्या स्त्री–पुरूषांना यातील बंधनरूपी भाग नको आहे. त्यांना देखील अन्य काही पर्यायांना सर्वसामान्य माणसाची मान्यता मिळेपर्यंत लग्नसंस्थेचाच आसरा घ्यावा लागतो, नाहीतर उद्‌भवलेल्या परिस्थितीषी सामना करताना दमछाक अनुभवावी लागते.

अषाप्रकारे दोन्ही बाजूंनी विचार करता असे वाटते की मुलं लहानाची मोठी होत असतानांच त्यांना 'न बदलणारी जीवनमूल्ये' आणि 'दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करणारी नीतीमूल्ये' जोपासण्यास उत्तेजन देणे आवष्यक आहे, जेणेकरून भावी जोडीदाराबरोबर त्यांच्या वागणुकीत परिपक्वता येईल आणि ते आर्थिक स्थैर्याबरोबर कौटुंबिक स्थैर्यदेखील मिळवू शकतील.

डॉ. सौ. प्राजक्ता कडूसकर